सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारताच्या पात्रता मोहिमेची सुरुवात बहरीनविरुद्ध

**दोहा :** भारतीय पुरुषांचा अंडर-२३ संघ बुधवारी येथे एएफसी-२३ आशियाई चषक सौदी अरेबिया २०२६ पात्रता गट एचच्या पहिल्या सामन्यात बहरीनविरुद्ध लढेल. मुख्य प्रशिक्षक नौशाद मूसा यांच्या मार्गदर्शनाखाली, भारतीय संघ प्रथमच आशियाई चषक स्पर्धेसाठी पात्र होण्याचे लक्ष्य ठेवत आहे. गेल्या सहा प्रयत्नांमध्ये, भारत पात्रता फेरीच्या पुढे प्रगती करू शकला नाही, म्हणून मूसा आणि त्याचे तरुण खेळाडू कतारच्या राजधानीत इतिहास रचण्यासाठी उत्सुक असतील. यजमान कतार आणि ब्रुनेई दारुस्सलाम हे गट एच मधील इतर दोन संघ आहेत. गट विजेते आणि सर्व ११ गटांमधील चार सर्वोत्तम उपविजेते पुढील वर्षी जानेवारीमध्ये सौदी अरेबियामध्ये होणाऱ्या अंतिम स्पर्धेसाठी पात्र ठरतील. मंगळवारी सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत मूसा म्हणाला, मला वाटत नाही की कोणताही संघ मोठा असतो. प्रत्येक प्रतिस्पर्ध्याचा आदर करणे महत्त्वाचे आहे. बहारीनचा विचार केला तर, आम्ही तयारीसाठी त्यांचे दोन-तीन सामने पाहिले आहेत. आम्हाला माहिती आहे की कतार हा एक खूप मजबूत संघ आहे.

### भारत, न्यूझीलंडविरुद्धच्या स्पर्धेतून कमिन्स बाहेर

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियाचा अव्वल वेगवान गोलंदाज आणि कसोटी कर्णधार पॅट कमिन्स भारत आणि न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी मर्यादित षटकांच्या मालिकेत खेळणार नाही. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सांगितले की, या वर्षाच्या अखेरीस इंग्लंडविरुद्धच्या ॲशेस मालिका लक्षात घेऊन त्याच्या पुनर्वसनाची व्यवस्था केली जात आहे. ऑस्ट्रेलिया १ ऑक्टोबरपासून न्यूझीलंडसोबत तीन टी-२० सामने खेळेल. त्यानंतर ते भारताविरुद्ध तीन एकदिवसीय (१९-२५ ऑक्टोबर) आणि पाच टी-२० सामने (२९ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर) खेळेल. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमधील ॲशेस मालिका २१ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये सुरू होतील. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एका निवेदनात म्हटले आहे की, भारत आणि न्यूझीलंड विरुद्धच्या आगामी मर्यादित षटकांच्या मालिकेसाठी कमिन्सची संघात निवड केली जाणार नाही.

### नाओमी ओसाकाने कोको गॉफला हरविले

**न्यू यॉर्क :** यूएस ओपनच्या चौथ्या फेरीत, जपानच्या नाओमी ओसाकाने तिसऱ्या मानांकित अमेरिकन कोको गॉफचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आर्थर ॲश स्टेडियमवर, ओसाकाने पहिल्याच गेममध्ये ब्रेक मिळवून आघाडी घेतली आणि संपूर्ण सामन्यात सर्व्हिसवर नियंत्रण राखले. गॉफच्या ३३ चुकांमुळेही मोठा फरक पडला. ओसाकाने पुन्हा एकदा गॉफला हरवण्यात यश मिळवले. ओसाकासाठी, २०२१ च्या ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपदानंतर ग्रँड स्लॅममधील ही सर्वांत मोठा विजय आहे.. विजयानंतर, तिने कोर्टवर भावनिक स्वरात येथे तिच्या पुनरागमनाला खास म्हटले आणि तिचा खेळ रंगतदार असल्याचे सांगून आत्मविश्वास व्यक्त केला. ओसाकाचा पुढील सामना ११ व्या मानांकित चेक रिपब्लिकच्या कॅरोलिना मुचोवाशी होईल. तिने युक्रेनच्या मार्टा कोस्ट्युकला ६-३, ६-७ (०-७), ६-३ असा पराभव केला. मुचोवा फ्लशिंग मीडोज येथे सलग तिसऱ्या उपांत्य फेरीच्या शोधात आहे, त्यामुळे ही स्पर्धा कठीण असणार आहे.

# भारताचा सामना आज कोरियाशी

### चांगली कामगिरी करण्याची गरज

### आशिया कप सुपर ४ स्पर्धा




◆ **राजगीर, २ सप्टेंबर**

पूल टप्प्यात अपराजित राहिल्यानंतर, आत्मविश्वासाने भरलेल्या भारतीय हॉकी संघाला बुधवारी आशिया कप सुपर ४ टप्प्यातील सामन्यात पाच वेळा विजेता आणि मागील विजेता कोरियाविरुद्ध खेळताना आपल्या कारगिरीत सुधारणा करावी लागणार आहे.

भारतीय संघ पूल अ मध्ये सर्व सामने जिंकून सुपर ४ मध्ये पोहोचला आहे. त्यांनी चीनचा ४-३, जपानचा ३-२ आणि कझाकस्तानचा १५-० असा दणदणीत पराभव केला. अपराजित असूनही, भारताची कामगिरी अपेक्षेनुसार झाली नाही. चीन आणि जपानविरुद्ध सरासरी कामगिरी केल्यानंतर, त्यांनी स्पर्धेत दुसऱ्यांदा खेळणाऱ्या कझाकस्तान संघाविरुद्ध मोठ्या फरकाने विजय मिळवला. दुसरीकडे, कोरियन संघही सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाही. पूल ब मध्ये मलेशियानंतर ते दुसऱ्या स्थानावर राहिले आणि मलेशियाने त्यांना ४-१ असा पराभव केला.

कडक उन्हात आणि उच्च आर्द्रतेत संघांना संघर्ष करावा लागला परंतु सुपर ४ सामने संध्याकाळी खेळवले जातील. त्यामुळे कामगिरी चांगली होण्याची अपेक्षा आहे. सोमवारी भारतीय संघाने गोलकिपिंग, डिफेन्स, मिडफिल्ड किंवा आक्रमण या सर्व क्षेत्रात चांगली कामगिरी केली. आघाडीची कामगिरी कौतुकास्पद होती ज्यामध्ये अभिषेकने चार गोल केले. सुखजीत सिंगनेही हॅट्‌ट्रिक केली आणि फ्लँकमधून त्याचे ड्रिब्लिंग आणि डी मधील शांत वृत्ती उत्कृष्ट होती.

भारताच्या फॉरवर्ड लाईनमधील एकमेव कमकुवत दुवा दिलप्रीत सिंग होता ज्याने गोल केला पण एक सोपी संधीही गमावली. आतापर्यंत स्पर्धेत तो संघर्ष करताना दिसला आहे आणि आता त्याला त्याची कामगिरी सुधारावी लागेल. भारताचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले, सुपर ४ टप्प्यापूर्वी स्ट्रायकर्सना फॉर्ममध्ये असणे महत्त्वाचे आहे.

मनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली मिडफिल्डची कामगिरीही चांगली झाली आहे आणि कर्णधार हरमनप्रीत सिंगने डिफेन्स खूप चांगल्या प्रकारे हाताळला आहे. पहिल्या दोन सामन्यांमधील सरासरी कामगिरीनंतर गोलकीपर कृष्ण बहादूर पाठकची कामगिरीही सुधारली आहे. तथापि, प्रशिक्षक फुल्टन म्हणाले की, खरी स्पर्धा आता सुरू झाली आहे ज्यामध्ये मागील निकाल महत्त्वाचे नाहीत. आमचा संघ आत्मविश्वासाने भरलेला आहे. खेळाडू फॉर्ममध्ये आहेत आणि आम्हाला हेच हवे आहे.

कझाकिस्तानविरुद्ध, हरमनप्रीत, जुगराज सिंग, संजय आणि अमित रोहिदास या तिघांनीही पेनल्टी कॉर्नरमध्ये रूपांतर केले. आशिया कप हा १४ ते ३० ऑगस्ट दरम्यान बेल्जियम आणि नेदरलँड्‌समध्ये होणाऱ्या विश्वचषकात थेट प्रवेश करण्याची संधी आहे. सामना संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल.

(वृत्तसंस्था)

# जागतिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्याने ऑलिम्पिकची भरपाई

### बॅडमिंटनपटू चिराग शेट्टीचे मत



◆ **नवी दिल्ली, २ सप्टेंबर**

पॅरिसमध्ये नुकत्याच झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक जिंकल्याने गेल्या वर्षी त्याच शहरात झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत पदक न मिळवू शकल्याची भरपाई झाली आहे, असे भारतीय पुरुष दुहेरी बॅडमिंटन संघाचा खेळाडू चिराग शेट्टी म्हणाला.

चिराग आणि त्याचा दीर्घकालीन जोडीदार सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी यांनी गेल्या आठवड्यात जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष दुहेरीत कांस्यपदक जिंकले. जागतिक नवव्या क्रमांकाच्या या जोडीने उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेत्या आरोन चिया आणि सोह वूई यिक यांचा पराभव करून जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत त्यांचे दुसरे पदक जिंकले.

उपांत्य फेरीत चीनच्या ११ व्या मानांकित चेन बो यांग आणि लिऊ यी यांच्याकडून पराभव झाल्याने भारतीय जोडीचे प्रथमच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्याचे स्वप्न भंगले. चिरागने वृत्तसंस्थेला सांगितले की, मला वाटते की आरोन आणि सोह यांच्याविरुद्धचा विजय निश्चितच खूप खास आहे. यामुळे हे सुनिश्चित झाले की जर आपण योग्य रणनीतीने खेळलो तर आपण कोणालाही हरवू शकतो. अलिकडेच त्यांच्याविरुद्धचा आपला रेकॉर्ड फारसा चांगला नव्हता. विशेषतः ऑलिम्पिकमध्ये जिथे आपल्याला त्यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला होता. म्हणून त्यांना सलग सामन्यांमध्ये पराभूत केल्याने निश्चितच आमचे मनोबल वाढले आणि गेल्या वर्षीच्या ऑलिम्पिकची ही एक प्रकारची भरपाई होती. तेथे आम्ही त्याच कोर्टवर त्यांच्याकडून पराभव पत्करला. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध जिंकणे खरोखरच खास होते.

एक वर्षापूर्वी, सात्त्विक आणि चिराग यांना ऑलिम्पिकमध्ये पदक गमावल्याचे दुःख सहन करावे लागले होते, जेव्हा मलेशियन जोडीने त्यांच्या मोहिमेत व्यत्यय आणला होता. कांस्य पदकासह, सात्त्विक आणि चिराग जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत एकापेक्षा जास्त पदके जिंकणाऱ्या खेळाडूंच्या क्लबमध्ये सामील झाले आहेत. सायना नेहवालने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत दोन पदके जिंकली आहेत तर पीव्ही सिंधूने पाच पदके जिंकली आहेत.

चिराग म्हणाला, सायना आणि सिंधूसोबत, आम्हीही जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत अनेक पदके जिंकणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सामील झालो आहोत हे जाणून खूप आनंद झाला. हे महत्त्वाचे आहे कारण गेल्या काही वर्षांचा काळ आमच्यासाठी मैदानावर आणि मैदानाबाहेर चांगला नव्हता.

(वृत्तसंस्था)

# दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक; नीलेश गायकवाड अकॅडमी अंतिम फेरीत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत त्यांची लढत ५ सप्टेंबरला रविंद्र निंबाळकर क्रिकेट अकॅडमीबरोबर होईल. मेडशिंगी (ता. सांगोला) येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत गायकवाड अकादमीने एचपीसीए अकादमीवर ७ गडी राखून विजय मिळविला.





**संक्षिप्त धावफलक**

एचपीसीए संघ : ४५ षटकात ५ बाद १५० ( विहान येवणकर ३७, गौरव गादेकर ३३, अभिषेक देशमुख २२, नितिकेश गज्जम २९/२, ऋग्वेद पाटील, अनुज वाल्मिकी, अथर्व पाटील व आनंद शेंडे प्रत्येकी एक बळी) पराभूत विरुद्ध निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी : ३५.२ षटकात ३ बाद १५४ (नितिकेश गज्जम नाबाद ५८, आनंद शेंडे ३४, रणवीर सिंग बोमरा १७, सुजल गायकवाड नाबाद १०, जयंश शहा, गौरव गादेकर, अरवन जाधव प्रत्येकी एक बळी).



# सुयश गुरुकुल येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

सुयश गुरुकुल येथे मेजर ध्यानचंद याच्या जन्मदिन २९ ऑगस्ट राष्ट्रीय दिन म्हणून साजरा होतो. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षक यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजा करण्यात आले. याप्रसंगी मेजर सुरेश मठ,नितीन खांडेकर, श्रीधर गायकवाड, अक्षय इगंले, मजर मंगोली, ऐश्वर्या होनकोर, शाम गुप्ते, आदी उपस्थित होते.

# लोकमंगल प्रशालेत क्रीडा दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

अवंती नगर येथील लोकमंगल माध्यमिक प्रशालेत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन वसंतराव नाईक हायस्कूलचे मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्याध्यापिका शुभांगी साठे व वसंतराव नाईक हायस्कूलचे कलाशिक्षक दाते शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्तिक चव्हाण यांनी आपल्या भाषणातून मेजर ध्यानचंद यांची कारकीर्द विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुषा पाटील यांनी केले. मुलाणी मॅडम यांनी आभार मानले राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे, कार्यकारी संचालक अभयसिंह साठे यानी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# ह.दे. प्रशालेचा यशवंतराजे पवार, वीरतपस्वीची अविघ्ना अंटद अजिंक्य

### शालेय लॉन टेनिस स्पर्धेत 30 शाळांतील १०५ खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ सप्टेंबर-**

शालेय लॉन टेनिस स्पर्धेत ह.दे. प्रशालेचा यशवंतराजे पवार व वीरतपस्वी स्कूलची अविघ्ना अंटद यांनी १४ वर्षांखालील गटात अजिंक्यपद पटकाविले.

जिल्हा क्रीडा संकुलातील टेनिस कोर्टवर याची सुरुवत झाली. याचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत ३० शाळेमधून १०५ खेळाडू सहभागी झाले आहेत. या स्पर्धा १४, १७ व १९ या वयोगटातील मुले व मुलींसाठी आयोजित केल्या आहेत. विशेष बाब म्हणजे पोलीस आयुक्त यांची कन्या प्रणव्या ही आय.एम.एस इंटरनॅशनल या शाळेत शिकत असून तीही यात सहभागी आहे.

मी पोलीस आयुक्त नव्हे तर एक पालक म्हणून या ठिकाणी आलो असून माझ्या सर्व खेळाडूंना शुभेच्छा असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. या प्रसंगी जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई आदी उपस्थित होते.



**अंतिम निकाल**

वयोगट १४ मुले : यशवंतराजे पवार (एच डी हायस्कूल) वि.वि. तनुज संचेती (के एल ई) ४/२. मुली : अविघ्ना अंटद (वितरपस्वी इंग्लिश मिडीयम स्कूल) वि.वि. मृण्मयी गायकवाड (नागेश करजगी ओर्चीड स्कूल) ४/२.

**विभागीय स्पर्धेसाठी निवडलेले गुणानुक्रमे पाच खेळाडू**

वयोगट १४ मुले : यशवंतराजे पवार, तनुज संचेती, आर्य पवार, आयान बोली, अनिकेत पडनुर. १४ मुली : अविघ्ना अंटद, मृण्मयी गायकवाड, उन्नती इंगोले, श्रीशा सूर्यवंशी, शनाया हिरेमठ

# पुरस्कारार्थींचा सत्कार सोहळा

**सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे दैनिक 'तरुण भारत'चे वृत्तसंपादक अजितकुमार सांगवे यांना पहिला अहिल्यादेवी क्रीडा पत्रकारितेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय जैन संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे, जिल्हा सदस्य विक्रांत बशेट्टी, हद्दवाढ विभागाचे अध्यक्ष अशोक भालेराव आदी.**





**सोलापूर : समृद्धी स्पोर्टस् क्लबच्या वतीने समृद्धी क्रीडा सेवा पुरस्कार प्राप्त क्रिकेटचे संघटक चंद्रकांत रेम्बर्सु यांचा सत्कार श्री निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीच्या वतीने करण्यात आला. यावेळी क्रिकेट संघटनेचे १४ वर्षाखालील निवड समिती चेअरमन राजेंद्र गोटे, राहुल म्हेत्रे, विनोद पाटील निलेश गायकवाड, विष्णू गायकवाड, वाल्मीक कीर्तिकर.**




# तालुका कुस्ती स्पर्धेत फॅबटेक पब्लिक स्कूलची कामगिरी

### कोळेकर, अजिंक्य शिंदे अजिंक्यपदाचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ सप्टेंबर -**

सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज, सांगोला मधील विद्यार्थ्यांनी कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत १७ वर्ष वयोगटातील कुस्तीमध्ये कोळेकर ग्रिको रोमन कुस्ती प्रथम, आदर्श शिंदे द्वितीय तसेच १९ वर्षे वयोगटमध्ये अजिंक्य शिंदे प्रथम, अभिषेक शिर्के, राहूल जमदाडे, शुभम साळूंखे यांनी व्दितीय क्रमांक प्राप्त केला.

तसेच मुलींच्या गटात फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात धनश्री शेंबडे व्दितीय व प्रार्थना नरुटे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक पंचाक्षरी स्वामी, आरिफ तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्कूलच्या सीईओ सारीका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील आदींनी अभिनंदन केले.